**वादींतर्फे साक्षदार क्र.१ अशोक विश्वनाथ गजभिये चा पुढील सरतपास वकील श्री.पी.बी.बांते यांच्यातर्फे शपथेवर पुढे सुरु.**

**१०.** मी माझे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र न्यायालयात दाखल केलेले आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून तो मी वाचून पाहिला आहे व तो मला समजला आहे. त्यावर माझी सही आहे. पुराव्याचे शपथपत्र **नि.२६** वर आहे.

**११.** मी दाव्यासोबत मुळ कागदपत्र दाखल केलेले आहेत. यादी नि.२८ वर दस्त क्र.१ वर आखीव पत्रीकाची सत्यप्रत दाखल केलेली आहे. सदर आखीव पत्रीकेवर मुख्यालय, सहा.भुमी अभिलेख, रामटेक यांची सही व शिक्का आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यांना **निशानी क्र.३३** देण्यात येते.

**१२.** सदर यादीसोबत अनु.क्र.२ वर दाव्याच्या नकाशाची सत्यप्रत दाखल केली आहे. सदर नकाशावर मुख्यालय, सहा.भुमी अभिलेख, रामटेक यांची सही व शिक्का आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यांना **निशानी क्र.३४** देण्यात येते.

**१३.** सदर यादीसोबत अनु.३ वर दि.११.०६.२०१८ रोजी वादी मी तक्रार केल्याबाबत पोलीस स्टेशन, रामटेक यांनी एनसी प्रतची कार्बन कॉपी दिली ती दाखल केली आहे. त्यावर माझी व संबंधीत पोलीस अधिकारी यांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **आर्टीकल पी–१** देण्यात येते.

**१४.** सदर यादीसोबत अनु.४ वर दि.१८.०२.२०१९ रोजी मी पोलीस स्टेशन, रामटेक येथे तक्रार दाखल केली होती. त्याची झेरॉक्स प्रत दाखल केली आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **आर्टीकल पी–२** देण्यात येते.

**१५.** सदर यादीसोबत अनु.५ वर दि.१८.०२.२०१९ रोजी मी तक्रार केल्याबाबत पोलीस स्टेशन, रामटेक यांनी एनसी प्रत ची कार्बन कॉपी दिले होती ती दाखल केली आहे. त्यावर माझी व संबंधीत पोलीस अधिकारी यांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **आर्टीकल पी–३** देण्यात येते.

**१६.** सदर यादीसोबत अनु.६ वर दावा मिळकत खरेदी केल्याबाबत दि.१९.१०.२००४ रोजीच्या खरेदी खताची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. त्यामध्ये माझे नांव व ज्यांच्याकडून खरेदी केली त्यांचे नांव व माझी व त्यांची सही आहे. तसेच साक्षीदारांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. (*सदर खरेदी खतास निशानी देण्याकरीता प्रतिवादी यांचे वकीलांनी हरकत घेतली की, सदरचे खरेदी खत वादीचे असून मुळ दस्तावेज त्यांच्या ताब्यात असल्याने त्याची मुळ प्रत दाखल करू शकतात तसेच संबधित अधिकारी जोपर्यंत सदर दस्तावेज न्यायालयात येवून प्रमाणीत करीत नाहीत तोपर्यंत सदर दस्तावेज यास निशानी देता येणार नाही. यावर वादी च्या वकीलांनी असा युक्तीवाद केला की, सदर प्रमाणीत प्रत मुळ खरेदी खताची प्रमाणीत प्रत आहे. तसेच सदर प्रमाणीत प्रत ही दुययम निबंधक रामटेक यांनी त्यांच्या कडे असलेल्या मुळ प्रतिवरून प्रमाणीत करून दिली असल्याने सदर प्रमाणीत प्रत हीस सक्षम अधिकारी यांचेकडून प्रमाणीत करण्याची गरज नाही. तसेच प्रतिवादी यांनी मुळ प्रत दाखल करण्याबाबत वादी यांना कोणताही नोटीस दिला नाही व दावा मिळकतीशी प्रतिवादी यांचा कोणताही हक्क व संबंध नाही, त्यामुळे सदर प्रमाणीत प्रत हीस निशानी देण्यात यावी – दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला कोणत्याही दस्तावेजास निशानी दिल्यास याचा अर्थ असा होत नाही की तो दस्तावेज व त्यातील मजकुर सिध्द झालेला आहे असे म्हणता येणार नाही. सबंधीत पक्षकाराने दस्त व त्यातील मजकुर हा योग्य त्या पुराव्यानिशी व कायद्याच्या तरतुदीनुसार सिध्द करावा लागतो. त्यामुळे सदर वादी यांनी घेतलेल्या हरकतीसह दस्तास निशानी देणे योग्य होईल.*) सदर दस्तास **निशानी क्र.३५** देण्यात येते.

**१७.** तसेच दाव्यात यादी नि.क्र.३० सोबत अनु.क्र.१ ते ४ वर मुख्याधिकारी, नगर परिषद, रामटेक यांनी महादेव नेवारे, गणपत नेवारे व अशोक गजभिये यांना दिलेल्या नोटीसची प्रत दाखल केलेली आहे. त्यावर मुख्याधिकारी साहेब यांची सही व शिक्का आहे. त्यास **आर्टीकल पी–४ ते पी–७** देण्यात येते.

**१८.** सदर यादीसोबत अनु.५ वर दि.१४.०५.२०२० रोजीचा मुख्याधीकारी, रामटेक यांनी वादी यांना दिलेलया पत्राची प्रत दाखल केली आहे. त्यावर मुख्याधीकारी, रामटेक यांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.

त्यास **निशानी क्र.३६** देण्यात येते.

**१९.** सदर यादीसोबत अनु.६ व ७ वर दोन फोटो दाखल केले आहेत. त्यास **आर्टीकल पी–८ व पी–९** देण्यात येते.

**२०.** तसेच सदर यादीसोबत अनु.क्र.८ वर दिनांक ०४.०४.२०१४ रोजीचे रवि आर्ट फोटो स्टूडीओ, रामटेक यांनी काढलेल्या फोटोवच्या बिलाची मुळ प्रत दाखल केली आहे. त्यावर प्रोप्रा.रवि महाजन यांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **आर्टीकल–पी–१०** देण्यात येते.

**२१.** सदर यादीसोबत अनु.क्र.९ वर दि.०६.०७.२०२३ रोजी मी मुख्याधीकारी, रामटेक यांना दस्तावेजांच्या प्रमाणीत प्रती मिळण्याकरीता अर्ज सादर केला होता, त्याची स्थळ प्रत दाखल केली आहे. त्यावर माझी सही असून तसेच नगर परिषद, रामटेक यांना प्राप्त झाल्याबाबत संबंधी लिपीकाची सही व कार्यालयाचा शिक्का आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशानी क्र.३७** देण्यात येते.

**२२.** तसेच यादी नि.क्र.३२ सोबत शिट क्र.१८ रामटेक शहर याचा नकाशाची सत्य प्रत दाखल केली आहे त्यावर उपअधिक्षक, भुमी अभिलेख रामटेक यांची सही व शिक्का आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशानी क्र.३८** देण्यात येते.

**सरतपास पुर्ण**

**<u>प्रतिवादी यांचे वकिलांचे विनंतीवरून उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब</u>**

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–

**(श्रीमती. डी. एस. सैंदाणे)**

२रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,

रामटेक.

रामटेक.

दिनांक – ०७/०३/२०२४.